150

ISSN 2231-6671

HI-TECH

ISSN 2231-6671

Published, Printed, Owned by Sow. Mahananda Balaji Kamble & Edited by Dr. Balaji Kamble & Printed at Jyotichandra Offset Printing & Binding & Published by Jyotichandra Publication, 'Gyandev - Parvati', R-9 / 139/6, Near Vishal School, L.I.C. Colony, Pragati Nagar, Latur. Dist. Latur-413531 (M.S.) India.

Editor In Chief : Dr. Balaji Kamble Mob.-9423346913

IMPACT FACTOR
3.18

ISSN 2229-4406

UGC Approved International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

URA

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

## UGC APPROVED PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XIV, Vol. IV**
**Year - VII (Half Yearly)**
**March 2017 To Aug 2017**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 -241913**
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
**Jyotichandra Publication**
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Suhas Avhad**
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

**Dr. E. Siva Nagi Reddy**
Director, National Institue
of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

**Dr. Yu Takamine**
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

**Dr. Sadanand H. Gone**
Principal, Ujwal Gramin
Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S )

**Dr. D. Raja Reddy**
Chairman, International Neuro Surjery
Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

**Dr. A. H. Jamadar**
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD
College,Chakur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Shaikh Moinoddin G.**
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

**Scott A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. Balaji S. Bhure**
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Babasaheb M. Gore**
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. V.J. Vilegave**
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

## INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Network Sniffers : An Internal Network Threat | Dr. S. V. Patil | 1 |
| 2 | Process of Research Methodology in Commerce | Rohan Kale | 7 |
| 3 | Contemporary Novels, Politics & Minority Communities : The Jews in The Septembers of ShiraZ by Dalia Sofer | Dr. L. G. Jadhav | 12 |
| 4 | Hieronimo's Madness is real or Feigned and Compare it with that of Hamlet | Prof. Sanjeev M. Suryawanshi | 19 |
| 5 | व्यंग्य साहित्य का भविष्य | प्रा. डॉ. जानअहेमद के. जे. | 24 |
| 6 | भाषा विज्ञान और उसके अंग | प्रा. यु. ए. बिरादार | 29 |
| 7 | भारतातील विदेशी थेट गुंतवणूक | डॉ. दयानंद शिंदे | 35 |
| 8 | जागतिकीकरण आणि ग्रामीण व दलित कविता | प्रा. केशव एस. कातकडे | 44 |
| 9 | लातूर जिल्ह्यातील पाणी समस्या : एक चिंतन | मोहंमद हनिफ इस्माईलसाब शेख | 55 |


02

S. P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O'bad

Issue : XIV, Vol . IV
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.18
ISSN 2229-4406
March.2017 To Aug. 2017


7

# भारतातील विदेशी थेट गुंतवणूक

**डॉ. दयानंद शिंदे**
अर्थशास्त्र विभाग
शंकरराव पाटील महाविद्यालय,
भूम, जि. उस्मानाबाद

**Research Paper - Economics**

**प्रस्तावना :**

भारताला 1947 साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताच्या सरकारने अर्थ व्यवस्थेसंबंधी काही सकारात्मक निर्णय घेतले. त्यामधील एक म्हणजे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणीला (FDI) देशात दिलेली संमती होय. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी परकीय देशांनी, कंपन्यांनी किंवा वित्तीय संस्थांनी भारत गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे. परदेशी गुंतवणूकदार जेव्हा देशातील भौतिक संपत्ती जसे की, कारखाने, जमिन, स्थावन मालमत्ता, प्रकल्प किंवा मशिनरी, सेवा क्षेत्र इ. मध्ये गुंतवणूक करतात तेव्हा त्याला "परकीय प्रत्यक्ष गुतवणूक" असे म्हणतात. अर्थात परदेशी उद्योग कंपन्या व आपल्या देशात गुंतवणूक करुन व्यवसाय करु शकतात. मागील काही दशकापासून परकीय प्रत्यक्ष गुंतवणकीचे भांडवलाचा एक स्त्रोत म्हणून असणारे महत्व वाढलेले आहे. सध्याच्या परिस्थितीत सर्व विकसनशिल देशांनी परकीय गुंतवणूकीच्या संबंधी उदार धोरण स्वीकारलेले दिसून येते.

" विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजे भारताबाहेरील व्यक्तींनी संस्थांनी भारतीय अर्थव्यवस्था भांडवलात केलेली गुंतवणूक होय." अशी गुंतवणूक ही परिकीय विनिमय व्यवस्थापन कायदा (Foreign exchange management act- FEMA-2000) अंतर्गत करण्यात येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणकीचा भारतातील ऐतिहासिक आढावा घेणे.
2. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक धोरणांचा अभ्यास करणे.
3. भारतातील एकूण विदेशी थेट गुंतवणूकीचा अभ्यास करणे.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O. bad

**संशोधनाची गृहीतके :**

1. भारतातील विदेशी थेट गुंतवणूक धोरणातील जाचक अटी कमी करण्यात आलेल्या आहेत.
2. भारतामध्ये परकीय थेट गुंतवणूक वाढलेली आहे.

**संशोधन पद्धती :**

शोध निबंधाच्या अभ्यास पद्धतीसाठी दुय्यम साधन सामग्रीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामध्ये विविध शासकीय व निमशासकीय प्रकाशने संदर्भग्रंथ, मासिके, साप्ताहिके, शोध निबंध, दैनिके व विविध वेबसाईटचा आधार घेण्यात आलेला आहे.

**शोध निबंधाच्या मर्यादा :**

भारतातील विदेशी थेट गुंतवणूकीची व्याप्ती लक्षात घेता सदर शोध निंबधास अनेक मर्यादा येतात. या शोध निबंधामध्ये 2014 ते 2016 या कालावधीत झालेल्या विदेशी थेट गुंतवणूकीचा अभ्यास करण्यात आलेला असला तरी या शोध निबंध अभ्यासासाठी वेळेची मर्यादा पडते.

**विदेशी प्रत्यक्ष गुंतवणकीचा भारतातील इतिहास :**

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणकीचे अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी असणारे महत्व लक्षात घेऊन भारत सरकारने तिला आकर्षित करण्यासाठी अनेक धोरणांचा स्विकार केलेला आहे. भारतामध्ये विदेशी गुतवणूकदारांना गुंतवणूक करण्यासंबंधी असणाऱ्या अनेक जाचक अटी व बंधने केंद्र सरकारने काढून टाकलेली आहेत. त्याचप्रमाणे गुंतवणूकीचे प्रमाण वाढविण्यासाठी अनेक प्रकारच्या गुंतवणीकीसंबंधी असलेल्या भारताच्या धोरणाचा इतिहास खालील चार टप्यात अभ्यासण्यात आलेला आहे.

**1. पहिला टप्पा : (1948-66)**

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ब्रिटीश शासनाच्या मुक्त व्यापारामुळे परकीय चलनाचे कोणतेही धोरण अस्तित्वात नव्हते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय बाजारामध्ये परिकीय उदयोगसंस्था गुंतवणूक करण्याऐवजी तयार माल पाठवायचे. परंतू भारतीय उदयोजकांनी कोणत्याही प्रकारच्या विदेशी मदतीविना कापड, कागद, सिमेंट उदयोग उभारले. परंतु स्टील उदयोग परकीय संस्थांची मदत घेऊन उभारले गेले. 1948 च्या औद्योगिक धोरणामध्ये प्रामुख्याने उदयोग - तंत्रज्ञान आणि ज्ञान यामध्ये परकीय गुंतवणूक करण्यास संमती देण्यात आली. 1950 च्य दशकात औद्योगिकरणची प्रक्रिया चालू असताना विदेशी भांडवल तांत्रिक सहकार्याच्या स्वरुपात भारतात येऊ लागले. परंतू 1948 च्या विनिमय दर संकटामुळे भारतासंबंधी परकीय सहकार्यात बदल झाले ते पुढीलप्रमाणे.

i) परकीय उदयोजकांनी अधिक समभाग घेण्यास सुरुवात केली.

ii) तांत्रिक सहकार्य हे मानधन आणि शुल्काऐवजी सहभाग (equity shares) सहभागाद्वारे घेण्यास सुरुवात केली. 1958 नंतर भारतीय उदयोजकांना परकीय गुंतवणूकीद्वारे परकीय उत्पन्न मिळविण्यासाठी तात्पुरते परवाने देण्यात आले. मे 1966 मध्ये भारत सरकारने अनिवाशी भारतीयांना (NRI) देशातील सार्वजनिक क्षेत्रातील उदयोग गुंतवणूक करण्यास परवानगी देण्यात आली.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

**2. दुसरा टप्पा : (1967-79)**

1970 साली जाहीर करण्यात आलेल्या नविन औद्योगिक धोरणानुसार देशातील मोठ्या औद्योगिक घराण्यांना आणि परकीय उदयोजकांना सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव असलेल्या उदयोगाव्यतिरिक्त असलेल्या उदयोगात गुंतवणूक करण्यास संमती देण्यात आली. सन 1972-73 साली परकीय विनिमय नियंत्रण कायद्यात (FERA) दुरुस्ती करुन सरकारने परकीय गुंतवणूकीला आकर्षित करण्याचे धोरण स्विकारले. मुलभूत व गाभाभूत व ज्यांना तंत्रज्ञानाची गरज आहे. अशा उदयोजकांना परकीय उदयोजकाबरोबर 74 टक्के सहभागामध्ये (shares) भागीदारी करण्यास परवानगी देण्यात आली. तसेच RBI च्या परवानगीची गरज नाही असेही सरकारने स्पष्ट केले.

**3. तिसरा टप्पा : (1980-90)**

तेल निर्यातदार विकसनशिल राष्ट्राकडून संसाधने मिळविण्यासाठी ऑक्टोबर 1980 मध्ये केंद्रसरकारने विदेशी गुंतवणूक धोरणाचा पुनआढावा घेतला. जेनेकरुन या देशाकडून भारतात येणाऱ्या गुंतवणूक प्रस्तावना तंत्रज्ञान हस्तांतरण संबधीची गरज राहिलेली नाही आणि ही गुंतवणूक पोर्टफोलिओ गुंतवणूक करता येऊ लागली. सन 1982-83 मध्ये सरकारने उदयोग क्षेत्राच्या समभागातील बँका ठेवी आणि गुंतवणूक या संबंधी असलेल्या धोरणात जूलै ऑगस्ट 1982 मध्ये भारतीय कंपन्याकडुन "समभाग आणि कर्जरोखे" यासाठी अधिक उदार धोरण स्विकारण्यात आले.

**RBI ने विनिमय दरासंबधी असलेल्या प्रक्रियात अधिक सुलभता आणली तसेच 1983-84 सरकारने पुढील सवलती देण्यास सुरवात केली.**

i) परकिय चलन मालमतेव्दारे आलेल दिर्घकालीन भांडवली नफयावर आयकरात सुट देण्यात आली.

ii) परकिय चलन मालमत्ता जी परकिय गुंतवणूक दराकडून सांभाळली जाते, तिला संपत्ती करातून सुट देण्यात आली.

iii) अनिवासी भारतीयाव्दारे (NRI) त्यांच्या भारतातील नातलगांना देण्यात येणाऱ्या भेटवस्तूवरील कर माफ करण्यात आले.

**4. चोथा टप्पा :(1991-2916)**

भारताने 1991 चे आर्थिक धोरण स्विकारण्यापूर्वी औदयोगिक संस्थाना या आर्थिक आणि तांत्रिकदृष्टया अतिशय कमजोर होत्या. याची कारणे अकार्यक्षमता, उच्च किंमती, दुर्वल व्यवस्थापन, स्पर्धा क्षमतेचा अभाव, आयातीवर असणारे निर्बंध, निर्यातीतील कमतरता इ. होय. फेब्रुवारी 1997 मध्ये भारतातील भांडवल खात्याचे उदारिकरण करण्याच्या हेतूने "एस.एस तारापेर" समिती स्थापन करण्यात आली. या समित्तिने सादर केलेल्या अहवाल 1999-2000 पर्यंत अर्थव्यवस्थेचे पूर्ण उदारिकरण करण्याचा सल्ला दिला आहे. त्यासाठी समितीने काही पूर्व अटी ठेवल्या त्या पूढील प्रमाणे :

i) राजाकोषीय तुट कमी करणे.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Ta. Bhoom Dist. O.bad

ii) भाववाढ आटोक्यात आणणे.

iii) बँकाची अनुत्पादक मालमत्ता कमी करणे.

**परकीय थेट गुंतवणूक धोरण 2016 :**

माननिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकित परकीय थेट गुंतवणूकीबाबत धोरणाला (FDI - 2016) मान्यता देण्यात आली. या सुधारणामुळे विदेशी गूंतवणूकदारांना भारतात गुंतवणुक करणे अधिक सोपे आर्णि सुलभ होणार आहे. त्यामुळे परकिय गुंतवणूकीचा ओघ देशात वाढण्यास मदत होणार आहे. तसेच रोजगाराच्या मुबलक संधी निर्माण होणार आहेत. लोकांचे उतत्र ही वाढण्यास मदत होणार आहे. परकिय थेट गुंतवणूक धोरण दुरुस्तीला सरकारने 20 जून 1016 रोजीच मजूरी दिली होती.

**1) भारतीय खादय पदार्थ आणि उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठे बदल :**

भारतात उत्पादीत होणारे अन्नधान्य आणि तयार होणाऱ्या खादययात्र पदार्थासाठी 100 टक्के परकिय थेट गुंतवणूकीला मान्यता देण्यात आली आहे. या क्षेत्रात थेट ई- कॉमर्सच्या माध्यमातुन व्यवसाय केला जाणार आहे.

**2) संरक्षण क्षेत्रातील विदेशी थेट गुंतवणूक :**

या पूर्वीच्या धोरणात कंपनीच्या समभागात (Equity shares) 49 टक्यापर्यंत गुंतवणूक करण्यास परवानगी होती आता देशाच्या संरक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची आवश्यकता असल्याने या क्षेत्रात 100 टक्के FDI ला मान्यता देण्यात आली आहे. 49 टक्यांपेक्षा जास्त परकिय गुंतवणूक असेल तर नियमानुसार सरकारची परवानगी देण्यात येईल मात्र ही गुंतवणूक आधुनिक तंत्रज्ञान निगडीत असावी. परकिय थेट गुंतवणूकीच्या मर्यादास लहान शस्त्रांच्या उत्पादनाला आणि दारुगोळा कायदा 1959 अंतर्गत येंणाऱ्या उत्पादनालाही लागू आहेत.

**3) औषधनिर्मिती क्षेत्र :**

हरीत क्षेत्रातील औषधे म्हणजे ती तयार करताना फक्त वनस्पतीजन्य रसायनांचा वापर केला जातो. अशा उदयोगासाठी परकिय थेट गुंतवणूक 100 टक्के करता येते. मात्र ब्राउन क्षेत्र म्हणजे ज्या औषधांच्या निर्मितीसाठी वनस्पती, प्राणीजन्य रसायनांचा वापर केला जाते. अशा उदयोगांना मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार 74 टक्यापर्यंत गुंतवणूकीची परवानगी घ्यावी लागेल. "(Forign investment promotionj Bord FIPB)

**4) नागरी उडान क्षेत्र :**

सध्याच्या विमानतळाचे आधुनिकीकरण करण्यासाठी उच्च उर्जाची सेवा प्रवाशांना देण्यासाठी आणि या विमानतळावरील वाढत्या गर्दीचा दबाव कमी करण्यासाठी हवाई क्षेत्रात 100 टक्के FDI ला मान्यता देण्यात आली आहे. या आधि हवाई वाहतुक सेवा, देशांतर्गत प्रवाशी विमान सेवा आणि प्रादेशिक हवाई वाहतुक सेवा यामध्ये 49 टक्यापर्यंत परकिय थेट गूंतवणूकीला मान्यता देण्यात आली होती. आता ही मर्यादा 100टक्यापर्यंत वाढविण्यात आली आहे.

**5) खाजगी सुरक्षा संस्था :**

खाजगी सुरक्षा संस्थामध्ये गुंतवणूकीची मर्यादा यापूर्वी 49 टक्यापूर्यत होती आता ही मर्यादा 74 टक्यापर्यंत

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O'bad

वाढविण्यात आली आहे. खाजगी सुरक्षा संस्थाना पूर्वीप्रमाणेच Private Security Agency PSIR Act 2005 नुसार आताही परवाना घ्यावा लागणार आहे.

**6) शाखा कार्यालयाची स्थापना :**

परदेशी व्यवसायिकांना भारतात कोठेही शाखा कार्यालय, संपर्क कार्यालया किंवा प्रकल्प कार्यालय सुरु करावयाचे असल्यास आता RBI ची परवानगी घड्याची आवश्यकता भासणार नाही. यासाठी व्यवसायाची संबंधीत मंत्रालयाने अथवा नियामक संस्थेने परवानगी दिली तरी पुरेसे ठरणार आहे.त्याचबरोबर "विदेशी गुंतवणूक प्रवर्तन मंडळाने" (forgn investment promotion Board) मान्यता दिल्यास भारतात परदेशी व्यवसायिकांना शाखा कार्यालाय स्थापन करता येणार आहे.

**7) पशुसंवर्धन क्षेत्र :**

FDI धोरण 2016 नुसार पखफसंवर्धन क्षेत्रात 100 टक्के गुंतवणूकीला मान्यता देण्यात आली आहे.

**8) एकल व्यापारी चिन्हांबअंतर्गत किरकोळ व्यापार क्षेत्र :**

या क्षेत्रात व्यापार करण्यासाठी तीन वर्षापर्यंत नियमामध्ये सवलत देण्यात आली आहे. स्थानिक सरकारच्या परवानगीने ही सवलत देण्यात येणार आहे.

**9) ब्रॉडकास्टिंग कॅटैज सर्वीस :**

ब्रॉडकास्टींग कॅंटेज सर्व्हीस FDI धोरणात सुधारण करण्यात आली आहे. नव्याने क्षेत्रीय मर्यादा आणि प्रवेश मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

i) टेलीपोर्ट क्षेत्रात 100 टक्के FDI ला मंजुरी दिली आहे.

ii) हेडएंड इन द स्काय (HIJS) ब्राडकास्टींग सर्व्हीस 100 टकके BCS मध्ये 49 टक्के पेक्षा जास्त गुंतवणूक असेल तर FIPS ची मान्यता घेणे आवश्यक असणार आहे.

iii) डायरेक्ट टु होम (DTH) 100 टक्के गुतंणूक

iv) केबल नेटवर्क राष्ट्रीय, राज्य, जिल्हा पातळीवर संचलीत असणारी सेवा 100 टक्के गूंतवणूक.

v) मोबाईल, टिव्ही 100 टक्के गूंवणुक.

**10) इतर क्षेत्र :**

सन 2013 ते 2015 मध्ये विविध क्षेत्रातील परकिय प्रत्यक्ष गुंतवणूक धोरणात केलेले बदल 1016-17 च्या धोरणात कायत ठेवण्यात आलेले आहेत ते खालीलप्रमाणे

i) मालमत्ता पूनर्रचना कंपन्यांना (Assess Reconstrution companies) त्यांच्या एकूण भांडवलापैकी परकिय प्रत्यक्ष गुंतवणूकीत आणि परकिय संस्थात्मक गुंतवणूक करण्यासाठी 100 टक्क्यापर्यंत परवानगी देण्यात आली. (ऑटोमेटीक व्दारे 49 टक्के तर त्यापेक्षा अधिक गुतवणुक गव्हर्नमेट रुटव्दारे)

ii) परीक्षण विपणन उदयोगासाठी (test marketing industries) FDI ची मर्यादा अगोदरपासुनच 100 टकके आहे परंतू अकाता 100 टक्के गुंतणूक ही आटोमेटीक रुटव्आरे करण्यास परवानगी देण्यात आली.

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

URA Issue : XIV, Vol . IV
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.18
ISSN 2229-4406
March.2017 To Aug. 2017


iii) पत माहिती कंपन्यासाठी FDI ची मर्यादा अगोदरपासूनच 100 टक्के करण्यात आली असून पूर्वी या उदयोगांना गव्हर्नमेंट रुटद्वारे परवानगी देण्यात येत अस ती आता ऑटोमेटीक रुटद्वारे देण्यात आली.

iv) चहा, कॉफी, रबर, वेलदोडा, पामतेल, ऑलिव्ह तेलाची मळे या क्षेत्रामध्ये FDI ची मर्यादा 100 टक्यापर्यंत वाढण्यात आली आहे. या व्यक्तिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या लागवडीत किंवा मळयात विदेशी गुंतवणूक करता येणार नाही. यात फक्त पाच वर्षांपर्यंत भागीदार किंवा संस्थाबरोबर गूंतवणूक केली जाऊ शकते.

v) सिंगल ब्रँड रिटेल क्षेत्र FDI ची मर्यादा पूर्वी इतकिच (100%) ठेवलेली आहे. परंतू FDI मर्यादेपैकी 49 टक्के ऑटोमेटीक रुटव्दारे मान्यता देण्यात येईल.

vi) मल्टी ब्रँड रिटेल क्षेत्रामध्ये FDI ची मर्यादा ऑटोमेटीक रुटव्दारे 51 टक्के एवढी ठेवली आहे. त्यापूढील गुंतवणूकीसाठी गव्हरर्नमेंट रुटव्दारे मान्यता घ्यावी लागणार आहे.

vii) पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, करीअर सेवा वस्तु विनिमय बाजार, रोखे बाजारातील कंपन्या यासाठी पूर्वीच्या गव्हर्नमेंट रुट पध्दती ऐवजी ऑटोमेटीक रुट पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. पेट्रोलियम आणि वायू क्षेत्रात ऑटोमैटीक रुट पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. पेट्रोलियम आणि वायू क्षेत्रात ऑटोमेटीक रुटव्दारे 100 टक्के FDI ला मान्यता देण्यात आली आहे.

भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करणारे पहिले पाच राष्ट्र (2000-2016) आकडे कोटीत (दशलक्ष अमेरिकन डॉलर)

| अ.क्र. | क्षेत्र | Apr-१४ Mar-१५ | Apr-१५ Mar-१६ | Apr-१६ Mar-१६ | एकूण प्रवाह Apr २००० to Dec २०१६ | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेवा क्षेत्र | २७३६९ | ४५४१५ | ५०६२० | ३०८९७५ | १८ % |
| | | (४४४३) | (६८८९) | (७५५३) | (५८३४५) | |
| २ | कन्स्ट्रक्शन डेव्हलपमेंट क्षेत्र (टाउनशिप, हाउसिंग) | ४६५२ | ७२७ | ६५९ | ११४५९६ | ८ % |
| | | (७६९) | (११३) | (९९) | (२४२८७) | |
| ३ | दूरसंचार क्षेत्र | १७३७२ | ८६३७ | ३७२७० | १२९९९८ | ७ % |
| | | (२८९५) | (१३२४) | (५५३९) | (२३९२१) | |
| ४ | कम्प्युटर सॉप्टवेअर आणि हार्डवेअर क्षेत्र | १४१६२ | ३८३५१ | १२१४९ | १२४३३३ | ७ % |
| | | (२२९६) | (५९०४) | (१८१४) | (२२८३२) | |
| ५ | अॅटोमोबाईल इंडस्ट्री | १६७६० | १६४३७ | ९७७६ | ९११७० | ५ % |
| | | (२७२६) | (२५२७) | (१४५३) | (१६५१८) | |
| ६ | औषधनिर्मिती क्षेत्र | ९०५२ | ४९७५ | ४५८४ | ७४६८१ | ४ % |
| | | (१४९८) | (७५४) | (६८७) | (१४५३७) | |

**Source - Department of Industrail policy and promotion report 2016 (FDI Statistics)**

S.P.Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

Issue : XIV, Vol . IV
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.18
ISSN 2229-4406
March.2017 To Aug. 2017


टेबल नं 1 मध्ये दाखवलेली आकडेवारी ही केवळ पाच राष्ट्रांची आहे. भारतामध्ये एप्रिल 2000 ते डिसेंबर 2016 पर्यंत एकुण 155 राष्ट्राची गुंतवणूक केलेली आहे यामध्ये NRI चा समावेश आहे.

**परकीय गुंतवणूक (FDI) आकर्षित करणारी क्षेत्रे - (Top - 10)**

**आकडे कोटीत (दशलक्ष अमेरिकन डॉलर)**

| अ.क्र. | क्षेत्र | Apr-१४ Mar-१५ | Apr-१५ Mar-१६ | Apr-१६ Mar-१६ | एकुण प्रवाह Apr २००० to Dec २०१६ | टक्केवारी (In terms of US $) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेवा क्षेत्र | २७३६९<br>(४४४३) | ४५४१५<br>(६८८९) | ५०६२०<br>(७५५३) | ३०८९७५<br>(५८३४५) | १८ % |
| २ | कन्स्ट्रक्शन डेव्हलपमेंट क्षेत्र (टाउनशिप, हाउसिंग) | ४६५२<br>(७६९) | ७२७<br>(११३) | ६५९<br>(९९) | ११४५९६<br>(२४२८७) | ८ % |
| ३ | दूरसंचार क्षेत्र | १७३७२<br>(२८९५) | ८६३७<br>(१३२४) | ३७२७०<br>(५५३९) | १२११९८<br>(२३९२२) | ७ % |
| ४ | कम्प्युटर सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर क्षेत्र | १४१६२<br>(२२९६) | ३८३५१<br>(५९०४) | १२१४९<br>(१८१४) | १२४३३३<br>(२२८३२) | ७ % |
| ५ | ॲटोमोबाईल इंडस्ट्री | १६७६०<br>(२७२६) | १६४३७<br>(२५२७) | ९७७६<br>(१४५३) | ९११७०<br>(१६५१८) | ५ % |
| ६ | औषधनिर्मिती क्षेत्र | ९०५२<br>(१४९८) | ४९७५<br>(७५४) | ४५८४<br>(६८७) | ७४६८१<br>(१४५३७) | ४ % |
| ७ | ट्रेडींगग | १६७५५<br>(२७२८) | २५२४४<br>(३८४५) | १३४४२<br>(२०००) | ८२२७९<br>(१३८७३) | ४ % |
| ८ | रसायन क्षेत्र (खतनिर्मिती क्षेत्र वगळून) | ४६५८<br>(७६३) | ९६६४<br>(१४७०) | ५२५०<br>(७८३) | ६४८०५<br>(१२६८३) | ४ % |
| ९ | पावर | २२९६<br>(७०७) | ५६६२<br>(८६९) | ६४५९<br>(९६१) | ५९०७३<br>(११४३७) | ४ % |
| १० | धातत् शुद्धीकरण क्षेत्र Metallurigical Sector | २१९६<br>(३५९) | २९८२<br>(४५६) | ८४१९<br>(१२५९) | ५१८४६<br>(१०१४९) | ३ % |

सन 2000 ते 2016 पर्यंत सर्वाधिक परकीय गुंतवणूक ही सेवा क्षेत्रात झालेली आहे. ज्यात वित्तिय बँकिंग, विमा, अवित्तीय, कुरीअर, तंत्रज्ञान इ. सेवा क्षेत्राचा समावेश होता. एकुण FDI च्या 8 टक्के गुंतवणूक सेवा क्षेत्रात झालेली आहे. हे वरील कोष्टकावरुन दिसून येते.

S.P.Mahavidyalaya, BHOOM
PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad

## देशातील विभागनिहाय सर्वाधिक गुंतवणूक (पहीले पाच विभाग)

रक्कम कोटीत (दशलक्ष अमेरिकन डॉलर)

| अ.क्र. | RBI विभागीय कार्यालय | राज्य समावेश (state covered) | २०१४ - १५ Apr - mar | २०१५ - १६ Apr - mar | Apr - २०१६ Dec - २०१६ | एकुण प्रभाव Apr २००० Dec २०१६ | एकुण टक्केवारी Inflows of US $ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | महाराष्ट्र, दादर, नगर हवेली, दमनदिव | ३८,९३३ (६,३६१) | ६२,७३१ (९,५११) | १,१७,६५८ (१७,५३६) | ५,३३,४११ (१,००,१६५) | ३१% |
| २ | नवी दिल्ी | दिल्ली, उत्तर प्रदेश भाग, हरियाणा | ४२,२५२ (६,८७५) | ८३,२८८ (१२,७४३) | ३२,४८८ (४,८४१) | ३,६४,८०० (६६,११४) | २१% |
| ३ | चेन्नई | तामिळनाडू, पॉंडीचेरी | २३,३६१ (३.८१८) | २९,७८१ (४,५२८) | ७,४२२ (१,१०५) | १,२५,९७० (२२,६४७) | ७% |
| ४ | बंगलोर | कर्नाटक | २१,२५५ (३,३४४) | २६,७११ (४,१२१) | ११,३७४ (१,६९७) | १,२०,२८६ (२१,१३८) | ७% |
| ५ | अहमदाबाद | गुजरात | ९,४१६ (१,५३१) | १४,६६७ (२,२४४) | १८,२१६ (२,७१८) | ८६,६८१ (१६,००३) | ५% |
| | एप्रिल २००० ते डिसेंबर २०१६ | एकूण प्रवाहाची बेरीज (Grand Total in flow) | १,८९,१७६ (३०,९३१) | २,६२,३२२ (४०,००१) | २,४०,३८५ (३५,८४४) | १७,३६,२४४ (३,२४,४७८) | |

भारत देश हा 29 राज्य आणि 7 केंद्रशासित प्रदेशात विभागलेला आहे. राज्यातील राहणीमान आणि उत्पन्नाचा दर्जा हा तेथील वातावरणावर अवलंबून आहे. ज्या राज्यात नैसर्गिक साधन संपत्ती जास्त आहे. अशा राज्याच्या विकास झालेला दिसून येतो. पायाभुत सोयी सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होताच तसेच बेरोजगारीचे प्रमाण देखील कमी होण्यास मदत होते. परकीय विदेशी गुंतवणीकीमुळे देशात 2013 साली एक लाख रोजगार निर्माण होते तर 2016 च्या अखेरपर्यंत सरासरी दोन लाख रोजगार निर्माण झालेले आहेत.

देशाअंतर्गत भारतीय रिझर्व बँकेने ठरवून दिलेली काही विभाग आहेत ज्यात मुंबई, नवी दिल्ली, चेन्नई, बेंगलोर, अहमदाबा, हैद्राबाद, कोलकत्ता, कोची, जयपूर, चंदीगढ, भोपाळ, पणजी, कानपूर, भूवनेश्वर, गुवाहटी, जम्मू इ. चा समावेश होतो. या विभागात सर्व राज्यांचा (29) समावेश करण्यात आलेला आहे. वरील कोष्टक नं. 3 मध्ये सर्वाधिक विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करणारे पहिले पाच विभाग दर्शविण्यात आलेले आहे. एप्रिल 2000 ते डिसेंबर 2016 पर्यंत एकुण विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक 17,36,244.27 कोटी रुपये झालेली दिसून येते.

**भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीची सद्यस्थिती :**

भारतामध्ये एकुण 15 पेक्षा जास्त राष्ट्रांनी परकीय विदेशी गुंतवणूक केली आहे आणि म्हणूनच देशाअंतर्गत

S.P.Mahavidyalaya,Bhoom
Bhoom
Tq.Bhoom Dist.O.bad

परकीय चलनाचा प्रवाह वाढलेला दिसून येतो. आज भारतात 32,478 दशलक्ष अमेरिकन डॉलरचा एवढा विदेशी गुंतवणूक झालेली आहे. 2015-16 या आर्थिक वर्षात भारताने FDI प्रकल्प अंतर्गत 63 अब्ज डॉलर इतकी विदेशी गुंतवणूक झाली आहे. देशात महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, झारखंड ही पाच अशी राज्य आहेत की ज्यात FDI चा प्रवाह वाढत आहे. त्यामध्ये 2016 च्या आकडेवारीनुसार गुजरात देशात प्रथमस्थानी आहे. गुजरात मध्ये 2016 च्या अखेरीस पर्यंत 12.4 अब्ज डॉलरची गुंतवणूक झालेली आहे. तर महाराष्ट्र हे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्यात 2015-2016 या आर्थिक वर्षात 8.28 दशलक्ष डॉलर इतकी गुंतवणूक झालेली आहे. परकीय गुंतवणूकदारासाठी भारतात गुंतवणूक करण्यासाठी चांगले वातावरण झाले. भारतात पायाभूत सुविधेसंबंधी काही अडथळे असले तरी त्यामध्ये वेगाने बदल होत असून भारतात FDI आकर्षित होत आहे.

**सारांश :**

भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर अर्थव्यवस्थेसंबंधी काही ठोस निर्णय घेतले. त्यामधीलच एक महत्वाचा निर्णय म्हणजे परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीला देशात येण्यास दिलेली संमती होय. परंतु असे असले तरीही भारतात विदेशी गुंतवणूकीचा प्रवाह मोठ्या प्रमाणात 1991 च्या आर्थिक सुधारणांच्या नंतरच सुरु झाला. याचे कारनण म्हणजे सरकारने अनेक सार्वजनिक उदयोगांचे खाजगीकरण करुन निर्गुंतणुकीचे धोरण स्विकारले तसेच अनेक जाचक अटी व बंधने दुर केले याचा परिणाम असा झाला की सध्या आशिया खंडात चीन या देशानंतर सर्वाधिक परकीय गुंतवणूक प्रवाह भारतात येत आहे.

भारताने FDI बाबत स्विकारलेल्या उदार धोरणामुळे विदेशी गुंतवणूकदारांना भारतात गुंतवणूकीस मुक्त वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे भारत गुंतवणूकीच्या आकडेवारीत IMF आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या यादीत उच्चस्थानी राहीला आहे. परंतु सर्वाधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी भारतात आजही काही क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची गरज आहे. त्यामध्ये राजकीय, अस्थिरता, पायाभुत सुविधाचा अल्पविकास भारताच्या कर रचनेत असलेला विस्कळीतपणा, सरकारकडून निर्णय घेण्यास होणारा विलंब, उदयोगासाठी भुधारणविषयक कायदे, यासारख्या बाबींचा समावेश होतो.

**संदर्भ सुची :-**

1) www.fdimarkets.com
2) www.fdintelligence.com/mardetsdemo
3) Bulletin of unique academy/june 14
4) www.pmindia .gov.in/31Aug2016
5) www.wikipedia.org
6) www.dipp.nic.in/2016
7) www.Indiastst.com
8) अर्थसंवाद / जाने - मार्च 2016

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad

S.P.Mahavidyalaya,Bhoom Ta.Bhoom Dist.O.bad Bhoom